**ISSN 0976-0377**

RNI. MAHMUL02805/2010/33461

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education for all Subjects

# INTERLINK RESEARCH ANALYSIS

**Editor In Chief**
**Dr. Balaji Kamble**

College of Arts & Science
Aurangabad

RNI. MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 6.20
ISSN 0976-0377
Issue : XX, Vol. I, July 2019 To Dec. 2019

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Customer Relationship Management in Banking Sector<br>**Dr. V. R. Gavhale** | 1 |
| 2 | Challenges in Indian Agriculture Economics<br>**Dr. B.V. Halmandage** | 7 |
| 3 | Role of Financial Inclusion for Sustainable Growth in India<br>**R. B. Bhandwalkar** | 22 |
| 4 | A Study of English Proverb in Language and Literature<br>**V. S. Bhutekar** | 29 |
| 5 | Oocytes Development In Lamellidens marginalis Due to Nero-endocrine manipulation during Summer Season<br>**Dr. P. R. Gaikwad** | 34 |
| 6 | स्वस्थ प्रशासन आणि नियोजन काळातील आरोग्याचा विकास<br>**दिलीप पांडूरंग महाजन, डॉ. राजेंद्रकुमार रामराव गव्हाळे** | 42 |
| 7 | भारतीय लोकसंख्येचा भौगोलिक अभ्यास<br>**डॉ. बळीराम पी. लहाने** | 47 |
| 8 | विदर्भातील प्राचीन वाङ्मय व वाङ्मयप्रकार<br>**डॉ.संतोष पां. बनसोड** | 53 |
| 9 | ग्रामीण कादंबरीतून येणारे वारकरी संप्रदायाचे वर्णन<br>**जी. डी. काकडे** | 57 |
| 10 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा स्त्री विषयक दृष्टीकोन<br>**डॉ. कल्पना त्र्य. मेहरे** | 60 |
| 11 | मानवी हक्क आणि महिलांचा सर्वांगीण विकास : एक दृष्टीक्षेप<br>**डॉ. एस.एन. दुतोंडे** | 64 |


Govt. College of Arts & Science, Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

RNI. MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 6.20
ISSN 0976-0377
Issue : XX, Vol. I, July 2019 To Dec. 2019 47

# भारतीय लोकसंख्येचा भौगोलिक अभ्यास

**डॉ. बळीराम पी. लहाने**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
नांदेड विभाग, नांदेड, जि. नांदेड

7 Research Paper - Geography

स्वातंत्र्यापूर्वी काळापासून लोकसंख्येचा अभ्यास केला गेला. सुरुवातीला लोकसंख्येचा अभ्यास पंधराव्या शतकात व्यापारवादी विचारवंतानी केला. व कोणत्याही राष्ट्राची लोकसंख्या वाढ ही देशाच्या हिताची असते कारण लोकसंख्या वाढली तर श्रमपुरवठा वाढतो त्यामुळे स्वस्त मजूर उपलब्ध होतात व लोकसंख्या वाढली तर सैन्यबळ वाढते व ते स्वसंरक्षणासाठी व दुस-या राष्ट्रावर आक्रमण करून ती बाजारपेठ ताब्यात घेण्यासाठी उपयोगी पडते. त्यामुळे लोकसंख्या वाढली पाहिजेत असे मत मांडले गेले. त्यानंतर मात्र त्थस या विचारवंतांनी लोकसंख्या वाढ ही आर्थिक प्रश्न निर्माण करते अशे मत मांडले. लोकसंख्या वाढ आणि अन्नधान्य वाढ या दोहोचा संबंध अभ्यासून त्यांनी लोकसंख्येतील वाढ ही अन्नधान्यातील वाढीपेक्षा जास्तीची असते त्यामुळे अर्थव्यवस्थेत दारिद्रय व उपासमार येते. म्हणजे लोकसंख्या वाढ राष्ट्राच्या हिताची नाही. लोकसंख्या गणिती श्रेणीने वर अन्नधान्य भुमिती श्रेणीने वाढते. लोकसंख्या वाढ आटोक्यात आणणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांनी प्रतिबंधात्मक उपाय व नैसर्गिक उपाय सांगितले प्रतिबंधात्मक उपाय हे मानवाने स्वकृर्तत्वाने लोकसंख्या आटोक्यात आणण्यासाठी केलेले उपाय होत. यात लग्न उशिरा करणे, लग्नानंतर संयम बाळगणे, नैतिकता, ब्रम्हचर्य हे उपाय सांगतिले आहेत व त्याचबरोबर या उपायामुळे लोकसंख्या आटोक्यात येत नाही तेव्हा ही लोकसंख्या आटोक्यात आणण्याचे काम निसर्ग करतो असे त्थस मत होते. पण तसे घडले नाही. त्यानंतर डॉ.एडवीन डॉ.कॅनन यांनी लोसंख्येसंबंधीच्या पर्याप्त, न्युन व अतिरिक्त लोकसंख्या याचा अभ्यास केला देशातील लोकसंख्या वाढत असेल आणि लोकसंख्येतील वाढीपेक्षा दरडोई उत्पन्न जास्त दराने वाढत असेल तर त्या राष्ट्राची लोकसंख्या न्यून असते व जर लोकसंख्या वाढत असताना दरडोई उत्पन्न जेव्हा लोकसंख्या वाढीबरोबर कमी होत असेल तर त्या राष्ट्राची लोकसंख्या अतिरिक्त असते. या सर्व संबंधाने भारतीय लोकसंख्येचे विविध पैलू आपण अभ्यासण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखात केलेला आहे.

Govt. College of Arts & Science, Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

RNI. MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 6.20
ISSN 0976-0377
Issue : XX, Vol. I, July 2019 To Dec. 2019


## अभ्यासाचा हेतू व अभ्यास पध्दती

भारताची लोकसंख्या २०१९ साली १३५०.४३ दशलक्ष एवढी होती असा संयुक्त राष्ट्रसंघाचे मत आहे. ही लोकसंख्या जागतिक लोकसंख्याच्या १७.७४ प्रतिशत एवढी आहे. म्हणजे जगातील ६ लोकांपैकी एक भारतीय आहे. जगात लोकसंख्येच्या बाबतीत भारताचा दुसरा क्रमांक आहे पहिला क्रमांक चीनचा आहे. भारताच्या लोकसंख्या वाढीचा दर १.१९ प्रतिशत एवढा आहे जो चीनपेक्षा ही जास्त आहे.

तक्ता क्र.१ मध्ये भारतातील १८९१ ते २०१९ पर्यंत लोकसंख्या वाढत किंवा घटत गेली व त्याचे प्रमाण याचा अभ्यास केलेला आहे.

**तक्ता क्र.१**

**भारतातील लोकसंख्येतील वाढ**

| वर्षे | लोकसंख्या (दशलक्ष) | लोकसंख्येतील वाढ किंवा घट (दशलक्ष) | लोकसंख्येतील प्रतिशत वाढ किंवा घट |
|---|---|---|---|
| १९९० | २३६ | - | - |
| १९०१ | २३६ | ०.० | ०.० |
| १९११ | २५२ | +१६ | ५.३ |
| १९२१ | २५१ | -१ | -०३ |
| १९३१ | २७९ | +२८ | ११.० |
| १९४१ | ३१९ | +४० | १४.२ |
| १९५१ | ३६१ | +४२ | १३.३ |
| १९६१ | ४३९ | -७८ | २१.६ |
| १९७१ | ५४८ | +१०९ | २४.८ |
| १९८१ | ६८३ | +१३५ | २४.७ |
| १९९१ | ८४६ | +१६१ | २३.९ |
| २००१ | १०२९ | +१८३ | २१.५ |
| २०११ | १२१० | +१८१ | १७.६४ |
| २०१९ | १३५० | +१४० | - |

भारताची लोकसंख्या १८९१ साली २३६ दशलक्ष एवढी होती ती २०१९ मध्ये १३५० दशलक्ष एवढी झालेली आहे. म्हणजेच जवळ जवळ साडेसहापट एवढी वाढलेली दिसून येते. सुरुवातीला १८९१ ते १९०१ या कालावधीत लोकसंख्येत वाढ झालेली नाही ती असे दिसून येते त्यानंतर १९११ ते १९२१ या भारताची लोकसंख्या कमी झालेली दिसून येते एवढाच या दहा वर्षाचा अपवाद वगळता सातत्याने भारताची लोकसंख्या वाढत गेलेली आहे. सर्वात जास्त लोकसंख्या वाढ ही १९९१ ते २००१ या कालावधीत झालेली आहे. ती १८३ दशलक्ष एवढी होती. म्हणजेच जवळ जवळ १८ कोटी लोकसंख्या या दहा वर्षाच्या कालावधीत वाढलेली दिसून येते.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

RNI. MAHMUL02805/2010/33461 IMPACT FACTOR 6.20 ISSN 0976-0377
Interlink Research Analysis Issue : XX, Vol. I, July 2019 To Dec. 2019


लोकसंख्या वाढीचा दशवार्षिक वाढीच्या दराचा विचार केला तर सर्वात जास्त लोकसंख्या वाढ ही १९६१ ते १९७१ या दशकात झालेली दिसून येते. १९८१ पासून लोकसंख्या वाढीचा दर कमी होताना दिसून येत आहे.

**धर्मानुसार लोकसंख्येची रचना**

भारतात सात धर्म आहेत. हिंदू, ख्रिश्चन, मुस्लीम, शिख, जैन, बौध्द, पारसी धर्म आहेत. त्याची लोकसंख्या किती आहे ते खालील तक्त्यात दाखवलेले आहे.

**तक्ता क्र.२**

**भारतातील धर्मानुसार लोकसंख्येची रचना (२०११)**

| धर्म | लोकसंख्या | प्रतिशत |
|---|---|---|
| सर्व धर्म | १२१०८५४९७७ | १००.०० |
| हिंदू धर्म | १६६३७८८६८ | ७९.८० |
| ख्रिश्चन | २७८१९५८८ | २.३० |
| मुस्लीम | १७२२४५१५८ | १४.२३ |
| शिख | २०८३३११६ | १.७२ |
| जैन | ४४५१७५३ | ०.३७ |
| बौध्द | ८४४२९७२ | ०.७० |
| इतर | ७९३७७३४ | ०.६६ |
| Not stated yet | २८६७३०३ | ०.२४ |

वरील आकडेवारीवरून असे दिसून येते की, भारतात धर्मनिहाय लोकसंख्येचा विचार करता हिंदू धर्माची लोकसंख्या ही जवळजवळ ८० प्रतिशत एवढी आहे. त्यानंतर मुस्लीम धर्माची लोकसंख्या दिसून येते ती १४.२२ प्रतिशत एवढी आहे. भारतात मुख्य सहा धर्म आहेत इतर चार धर्माची लोकसंख्या ५ प्रतिशतच्या आसपास आहे. या धर्माचा वापर राजकारणासाठी केला जात असून धर्माधर्मात फूट पाडण्याचे काम भारतीय राजकारण्याकडून होताना दिसून येते. त्यामुळे राष्ट्रात दहशतवाद ऊफाळताना दिसून येतो.

**भारतातील जननदर व मृत्यूदर**

जननदराचा व मृत्यूदराचा अभ्यास करताना दर हजारी लोकसंख्येमागे दर वर्षी किती बालके जन्मतात त्याला जननदर असे म्हणता व दर हजारी लोकसंख्येमागे दर वर्षी किती लोक मृत्यू पावतात त्याला मृत्यूदर असे म्हणतात. जननदर व मृत्यूदरातील फरकाएवढी लोकसंख्या वाढते. खालील तक्त्यात भारतातील जननराचा व मृत्यूदराचा अभ्यास केलेला आहे.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

RNI. MAHMUL02805/2010/33461
Interlink Research Analysis
IMPACT FACTOR 6.20
ISSN 0976-0377
Issue : XX, Vol. I, July 2019 To Dec. 2019 

तक्ता क्र.३

भारतातील सरासरी वार्षिक जननदर व मृत्यूदर

| दर दहा वर्षे | जननदर | मृत्यूदर |
|---|---|---|
| १८९१-१९०० | ४५.८ | ४४.४ |
| १९०१-१९१० | ४८.१ | ४२.६ |
| १९११-१९२० | ४९.२ | ४८.६ |
| १९२१-१९३० | ४६.४ | ३६.३ |
| १९३१-१९४० | ४५.२ | ३१.२ |
| १९४१-१९५० | ३९.९ | २७.४ |
| १९५१-१९६० | ४०.० | १८.० |
| १९६१-१९७० | ४१.२ | १९.२ |
| १९७१-१९८० | ३७.२ | १५.० |
| २०१०-२०११ | २१.८ | ७.० |
| २०१६-२०१७ (अंदाजे) | १९.० | ७.३ |

वरील आकडेवारीवरून असे दिसून येते की, भारतात जननदराचे प्रमाण व मृत्यूदराचे प्रमाण कमी होताना दिसून येते. त्यातल्यात्यात मृत्यूदराचे प्रमाण कमी होणे अतिशय महत्वाची बाब आहे. भारतात आरोग्य विषयक सुविधा शासनातर्फे विनामूल्य किंवा नाममात्र मूल्यावर पुरविल्या जातात त्यामुळे मृत्यूदर कमी होताना दिसून येते. भारतात १९०१-१९१० या काळात जननदर ४८.१ एवढा होता तर मृत्यूदर ४२.६ एवढा होता म्हणजेच ५ बालके जास्त जन्माला येत होती म्हणजेच तेवढी लोकसंख्या वाढत होती. हळूहळू जननदर कमी होताना दिसून येतो तो २०१६-१७ साली १९.० एवढा आहे पण मृत्यूदरही कमी झालेला आहे. पण जननदर व मृत्यूदर यातील तफावत ११.३ एवढी झालेली आहे म्हणजे दरवर्षी एक हजार स्त्री-पुरुषामागे ११.३ एवढी लोकसंख्या वाढते व ती विकासाला मारक ठरते. म्हणून मृत्यूदर कमी व्हावा पण त्याहीपेक्षा अधिक महत्त्वाचे म्हणजे जननदर कमी करणे हा होय. तर भारताला लोकसंख्या आटोक्यात ठेवणे शक्य होईल.

**अभ्यासाचा उद्देश**

१) भारतातील लोकसंख्या एकूण वाढीचा व लोकसंख्या वाढीच्या दराचा अभ्यास करणे.

२) भारतातील लोकसंख्या वाढीच्या मुख्य कारणाचा म्हणजेच जननदर व मृत्यूदर यातील फरकाचा अभ्यास करणे.

३) भारतातील लोकसंख्येच्या वयोमानानुसार रचनेचा अभ्यास करणे.

४) धर्मानुसार लोकसंख्येच्या रचनेचा अभ्यास करणे.

**अभ्यास पध्दती**

संबंधीत अभ्यास हा द्वितीय माहितीवर अवलंबून आहे व त्यासाठी वर्तमानपत्रे, मासिके,

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

पुस्तके, वेबसाईट इ. साधनाद्वारे माहितीचे संकलन करून वाढीचा दर, प्रमाण काढलेले आहे.

**भारतातील लोकसंख्येची वयोमानानुसार रचना**

भारतातील लोकसंख्येची वयोमानानुसार रचनेचा अभ्यास करताना बालकाचे प्रमाण म्हणजे ०.१४ वयोगटात मोडणा-यांची संख्या किती आहे व १५५९ वयोगटात मोडणारी लोकसंख्या किती आहे तसेच ६० च्या पुढचे लोकसंख्या किती याचा अभ्यास होय. ०-१४ व ६० च्या पुढची ही लोकसंख्या कर्ती लोकसंख्या नसते तर १५-५९ या वयोगटातील लोकसंख्या ही कर्ती लोकसंख्या होय ज्याच्यावर देशाचे उत्पादन वाढून विकासाची जबाबदारी असते.

**तक्ता क्र.४**

**भारतातील लोकसंख्येची वयोमानानुसार रचना**

| वर्षे | वयोगट ०-१४ | १५-५९ | ६० च्या पुढे |
|---|---|---|---|
| १९११ | ३८.८ | ६०.२ | १.० |
| १९२१ | ३९.२ | ५९.६ | १.२ |
| १९३१ | ३८.३ | ६०.२ | १.५ |
| १९६१ | ४१.० | ५३.० | ५.७ |
| १९७१ | ४१.४ | ५३.४ | ५.२ |
| १९८१ | ३९.७ | ५४.१ | ६.२ |
| १९९१ | ३६.५ | ५७.१ | ६.४ |
| २०० | ३५.६ | ५८.२ | ६.३ |
| २०१७ | २७.३४ | ६६.४२ (१५-६४ पर्यंत) | ६.२४ (६५ च्या पुढचे) |

भारतातील लोकसंख्येचा वयोमानानुसार अभ्यास केला असता असे दिसून येते की, भारतात १९११ साली नाकर्ती लोकसंख्या ही ३९.८ प्रतिशत एवढी होती ती १९८१ पर्यंत वाढत गेलेली दिसून येते मात्र १९८१ नंतर त्याचे प्रमाण कमी झालेले दिसून येते. प्रमाण जरी कमी झालेले दिसत असले तरी एकूण लोकसंख्या मात्र वाढत जाताना दिसून येते.

तसेच १९७१ नंतर ०-१४ वयोगटातील लोकसंख्येचे प्रमाण कमी होत आहे. त्याचबरोबर ६० च्या पुढील लोकसंख्येचे प्रमाण वाढताना दिसून येते त्याचा परिणाम वृध्दाच्या समस्या आधिक गंभीर होताना दिसतात त्यातूनच वृध्दाश्रमाची निर्मिती झालेली दिसून येते तसेच कौटुंबिक कलहाचे प्रमाणही वाढलेले दिसून येते.

**अभ्यासाचे निष्कर्ष :**

१) भारताची लोकसंख्या चीनपेक्षा सध्या कमी असली तरी लोकसंख्या वाढीचा दर चीनपेक्षा

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

RNI. MAHMUL02805/2010/33461 IMPACT FACTOR 6.20 ISSN 0976-0377
Interlink Research Analysis Issue : XX, Vol. I, July 2019 To Dec. 2019 

जास्तीचा आहे ही चिंताजनक बाब आहे. जगातील लोकसंख्येच्या १७.७४ प्रतिशत लोकसंख्या भारतात राहते अशीच लोकसंख्या वाढत राहिली तर अर्थव्यवस्थेतील, दारिद्र्य, बेकारी, दहशतवाद यासारख्या बाबी वाढत जाणार.

२) १८९१ पासून ते आजपर्यंत जननदर व मृत्यूदर कमी होताना दिसून येतो पण मृत्यूदर कमी होणे अतिशय आनंदाची बाब आहे पण जननदर जास्त राहणे ही चिंतेची बाब आहे.

३) धर्मानुसार लोकसंख्या विचार केला तर सर्वात जास्त लोकसंख्या हिंदू धर्माची आहे. त्यानंतर मुस्लीम धर्माची लोकसंख्या आहे. त्यामुळे भारतात धर्मा धर्मात कलह तसेच जाती जातीत कलह, जाती अंतर्गत कलह दिसून येतो व देशातील शांततेसाठी हे फार मोठे आव्हान आहे.

४) लोकसंख्येचा वयोमानानुसार विचार केला तर १४ वर्षाच्या पेक्षा जास्त व ६० वर्षाच्या पुढे याचे प्रमाण भारतात अभ्यासले तर १४ वर्षाखालील नाकर्ती लोकसंख्या कमी होताना दिसून येते पण ६० व्या वर्षानंतरची लोकसंख्या वाढते आहे याचा परिणाम वृध्दाच्या समस्या अधिक गंभीर झालेल्या आहेत.

५) युवकाची संख्या फार मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे व त्याच्या हाताला काम पुरविणे अवघड झाल्यामुळे बेकारी वाढत जात आहे त्याचा परिणाम विवाहसंस्थेवर होताना दिसून येतो.

## संदर्भ सूची :-

1) Coale, A.J. and Hoover, E.M. - Population Growth and Economic Development in Low-income Countries.

2) Pathe V.P. - Population Policy and Compulsion in Family Planning, 1981.

3) Ashish Bose - The consum of India - A Historical perspective Demography India, Vol-||, No.1, June 1973.

4) Donald J. Bogue, Principles of Demogaphy, New York, John wiley and Sons, 1969.

5) Tomas Freika, The Future of Population Growth, New York, John and Sons, 1973.

6) B. Benjamin, Social and Economic Factors, Affecting, Mortality, The Hogue - Mouton and Company, 1965.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad